ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# इंदिरा गांधी आणि नॅम (1980—84 या कालखंडातील एक चिकित्सक अभ्यास)

प्रा. डॉ. भागवत वाघ,
इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग आणि पुरातत्वशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

★★★

**प्रस्तावना** — अलिप्ततावाद हा शब्दप्रयोग सर्वप्रथम पंडित नेहरुंनी १९५४ मध्ये कोलंबोतील एका भाषणात केला. (मी माझ्या एका लेखात अलिप्ततावाद ह्या शब्दालाच हा शब्द वापरत आहे. कारण अलिप्तातावाद म्हणजे अलिप्त न राहणे तर सत्ता गटाच्या राजकारणापासून दूर राहात नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांच्या हितासाठी विकसित राष्ट्रांसोबत वेळप्रसंगी भांडने सुद्धा होय). आंतरराष्ट्रीय क्षेत्रात लष्करी स्वरूपाच्या व गटातटाच्या राजकारणापासून अलिप्त राहणे म्हणजे असलग्नतावाद होय. होकारात्मक तटस्थता असा अलिप्ततेचा अर्थ लावता येईल. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू भारताच्या अलिप्ततावादी धोरणाचे स्पष्टीकरण करताना म्हणाले होते की कोणत्याही राष्ट्राचे अंकित म्हणून न राहता. आंम्ही एक स्वंतत्र राष्ट्र या नात्याने आंतरराष्ट्रीय परिषदामध्ये भाग घेऊ. आम्ही सत्तागटाच्या राजकारणापासून अलिप्त राहू इच्छितो. अमेरिका, रशिया या महासत्ताच्या गटामध्ये सामील न होता जागतिक व्यासपिठावर भारतास सन्मानाचे स्थान मिळविता येईल. असलग्नतावादाचे उद्गाते असे नेहरुंना संबोधले जाते. नेहरुंनी आपल्या आचरणातून असलग्नतावादाला आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्त्वाचे स्थान प्राप्त करून दिले. विधायक क्रियाशील व निश्चित स्वरूपाचा नीतीप्रवाह म्हणून असग्नतावाद या धोरणास महत्त्व आहे.

**उद्देश :** —

१) असल्नतावाद ही नुकत्याच स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांची संघटना होती.

२) प्रामुख्याने भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या संकल्पनेतून ती साकार झाली होती.

३) भारत प्रामुख्याने जगाचे नेतृत्व करत होता व अविकसित राष्ट्रांच्या साठी आर्थिक स्वावलंबत्व कसे प्राप्त करता येईल यासाठी प्रयत्न करत होता.

४) नेहरुंच्या कालखंडात या असल्नतावाद धोरणाला महत्त्व होते. परंतु नेहरुंच्या नंतर ह्या धोरणाचे महत्व कमी झाले का ते तपासणे.

५) प्रामुख्याने इंदिरा गांधी यांचा नेहरुंच्या खालोखाल आंतरराष्ट्रीय प्रवास व दबदबा राहीला आहे.

६) इंदिरा गांधीनी ही सत्तागटाच्या राजकारणात असल्नतावादी भूमिका कायम ठेवली.

७) इंदिरा गांधीच्या पहिल्या कालखंडावर. (१९६६—७७) संशोधन व लेख आहे. परंतु दुसर्या (१९८०—८४) ह्या कालखंडावर प्रामुख्याने संशोधन झालेले नाहीत. त्या निमित्ताने हा संशोधनपूर्ण लेख.

बेल्ग्रेड परिषदेला वीस वर्षे पूर्ण झाल्याबद्दल युगोस्लावियाचे वर्तमानपत्र बोर्बा यास १९ जानेवारी १९८१ रोजी इंदिरा गांधी यांनी संदेश पाठविला. त्यात त्या म्हणाल्या कि नॅम समुदायाच्या अंतर्गत असे देश होते. ज्यांनी आपली वसाहतवाद आणि परकीय अधिपत्यातून मुक्तता केली होती. नॅमची सदस्यसंख्या चार पटीने वाढली होती हा एक पुरावा होता की नॅमचे धोरण कित्ती समर्पक आणि सजीव होते. चळवळीने नेहमीच वसाहतवाद रंगभेद आणि साम्राज्यवादाचे अधिपत्य संपवण्यासाठी काम केले. भारत रंगभेद विरोधातील आफ्रिकन जनतेचा विजय आणि पॅलेस्टाइन जनतेच्या संघर्षाच्या सफलतेच्या प्रतीक्षेत होता. नॅमचे मुख्य सूत्र होते शांततापूर्ण सहजीवन. जर जगातील लोकांसाठी संपूर्ण विकास करायचा असेल तर अण्वस्त्र आणि युद्ध संपविणे आवश्यक होते.[१] परंतु आंतरराष्ट्रीय वातावरण बिघडत होते. जगाच्या वेगवेगळ्या भागात जागतिक सत्ताची शक्ती पसरली व शस्त्रास्त्र संघर्षात वाढ झाली. नॅमने नेहमीच आर्थिक सहकार्यावर जोर दिला. यासाठी अधिक कार्ये होणे जरुरीचे होते. ०९ फेब्रुवारी १९८१ रोजी दिल्ली येथे नॅम देशांच्या परराष्ट्र मंत्र्याची परिषद झाली. इंदिरा गांधीनी उद्घाटनपर भाषणात गांधीजीचे शब्द उध्वृत केले. "भारत अशा प्रत्येका पासून स्वंतत्र होऊ इच्छितो कि ज्याला आमच्या देशावर मालकी प्रस्थापित करण्याची इच्छा आहे. आम्हाला फक्त मालक बदलावयाचा नाही तर आमच्या भूमीवर आमची स्वतःची मालकी प्रस्थापित करावयाची आहे." त्या म्हणाल्या कि हे उदगार नॅमचे राजकीय तत्व होते या प्रकारची मुक्तता आणि शांतता स्वांतत्र्यासाठी नितांत गरजेची होती.[२] इंदिरा गांधी पुढे म्हणाल्या कि युरोपमध्ये शांतता होती, आशियात संकटे वाढत होती. लटीन अमेरिका आणि कॅरिबीयन क्षेत्रात नवीन दबाव काम करिता होते. आर्थिक धमक्या सुद्धा दिल्या जात होत्या. तसेच लष्करी शक्ती आणि अडयांना पुन्हा वाढविले जात होते. अणुयुद्धाचा धोका पाहता असल्नतावादाची प्रासंगिकता आणि शांततेसाठी पुन्हा समर्पन यांची आवश्यकता होती. या परिषदेद्वारा महासत्ताच्या विरोधात आवाज उठवून युद्धाच्या भाषेचा त्याग, हिंदी महासागर आणि आशिया आफ्रिकेच्या वेगवेगळ्या भागात त्यांची उपस्थिती कमी करणे तसेच शांतता आणि समजूतदारपणा साठी चांगल्या मनाणे शोध सुरु करणे आवश्यक होते. त्या म्हणाल्या होत्या कि नॅम देषांना अफगानिस्तान संबधी दुरुख होते, पश्चिम आशियातील भांडणाचा जनतेवर तसेच नॅमवर

प्रभाव पडला होता. नॅमला आशा होती कि जागतिक सत्ता स्थानिक तणावाचे संघर्षात रुपांतर करणार नाहीत. शांतता आणि मानवजातीच्या भविश्याच्या कल्याणासाठी, युद्धात देश तसेच युद्धासाठी आतुर असनार्या देशांना त्यांनी आवाहन केले कि त्यांनी आपल्या जवानांना परत बोलवावे.

इंदिरा गांधी म्हणाल्या की हे अनुभव सिद्ध होते कि राजकीय अवडबंर आणि आर्थिक शोशण यांची निकटची साथ होती. राजकीय स्वातत्र्यांच्या सहाय्याने आर्थिक प्रगती संभाव होईल. नॅमच्या अंतर्गत राजकीय प्रगती बरोबरच आर्थिक पैलूंचे पण समान महत्त्व होते. अल्जियर्स, कोलम्बो आणि हॅवाना येथील परिषदेत आर्थिक घटकावर जोर दिला होता. त्यांचा आग्रह होता कि आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था मजबुतीसाठी जागतिक वार्तालाप सुरु करावा. विकसित आणि विकसनशील राष्ट्रातील अडथळे दुर करणे ही एक जबाबदारी होती. विकसनशील देशांची एकजूट महत्वाची होती.[३] इंदिरा गांधी म्हणाल्या कि नॅमच्या विरोधात सरंक्षणवादाचा प्रयोग होत असेल,दुर्बलांच्या विरोधात मजबूत राष्ट्रे पारंपारिक अस्त्रे वापरीत असतील, तर नॅम राष्ट्रांनी अंतर्गत व्यापाराचा विस्तार का करू नये? विकसित राष्ट्राकडून अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि अन्नधान्य सहाय्यासाठी दबावाचा प्रयोग होत असेल तर नॅम राष्ट्रांनी वित्तीय, तंत्रज्ञान आणि कृषिक्षेत्रात परस्परांच्या हितासाठी, सहकार्यासाठी व्यापक उपाय करणे आवश्यक होते. त्यांनी आवाहन केले होते कि नॅम राष्ट्रांच्या प्रत्येक बैठकीच्या वेळी जागतिक सत्ता संषय आणि विभाजनाचे बी पेरण्यासाठी कुटनीती आणि प्रचार यासाठी दुप्पट वेगाने सुरुवात करतात. दबावातून बाहेर पडण्यासाठी एकत्र येऊन सुद्धा मुल सिद्धांत आणि उद्देष्य यावर काम केले पाहिजे. नॅम राष्ट्रे शाब्दिक खेळीसाठी नाही तर नॅमचा प्रामाणिकपणा आणि प्रभाव यांचा पुर्नस्थापनेसाठी एकत्र आलो होतो. ११ फेब्रुवारी १९८१ रोजी इंदिरा गांधी म्हणाल्या कि अधिपत्याच्याविरुद्ध कठोर संघर्शासाठी नॅम राष्ट्रांनी परत एकदा कोणाच्या छत्रछायेखाली जावे का? नॅम राष्ट्रे सर्वासोबत मित्रता करू इच्छित होते. भारताचे हे धोरण होते कि ज्या ठिकाणी मित्रता होती तिला सदृढ करणे. ज्या ठिकाणी उदासीनता होती त्या ठिकाणी समजदारी आणि मनमिलाफ वाढविणे व षत्रुता असेल तर ती संपविणे.

युरोप आणि अमेरिका मोठ्या हुशारीने आशियायी भूमीकडे वळत होते. त्यांनी अटलांटिक महासागरलाच प्रदूषित केले नाही तर प्रशांत महासागर, हिंदी महासागर याकडे ते वळले होते. जागतिक सत्तातील संघर्ष जगाच्या वेगवेगळ्या भागात विषेशत पश्चिम, दक्षिण, आग्नेय आशियात लष्करी स्पर्धा, आण्विक शस्त्रास्त्रे बाळगणाऱ्या देशांची वृद्धी, आर्थिक विकासासाठीची बेजबाबदारी आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात बेफिकिरीचे आचरण या सर्व कारणामुळे नॅमसमोर समस्या निर्माण झाल्या होत्या. चिंतेचा विषय हा होता की जगाच्या आर्थीक, सामाजिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर असंतुलन आणि असमानता तसेच लोकसंख्या वाढीचा दबाव आणि भौतिक, तांत्रिक साधनाच्या उपलब्धतेसंबधी सामंजस्यातील स्पष्टपणाचा अभाव. विश्वकल्याण तोपर्यंत कोरी कल्पना राहील जो पर्यत विकसनषील देशांच्या आकांक्षा आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत प्रतिबिंबित आणि आंतरराष्ट्रीय चर्चा परिणामात रुपांतरीत होणार नाही.

०३ सप्टेंबर १९८१ नॅम देशांच्या प्रेस एजन्सीला इंदिरा गांधी यांनी मुलाखत दिली, मुलाखतीत त्यांना प्रश्न विचारण्यात आला कि, कालौघात आंतरराष्ट्रीय प्राधान्यक्रम व वसाहतवाद आणि साम्राज्यवाद नष्ट करणे या ऐवजी राष्ट्रीय विकास साध्य करणे हा झाला होता. हे नवीन आवाहन नॅम चळवळ कशी पेलणार होती. त्या म्हणल्या नॅम चळवळ आशिया, आफ्रिका, आणि इतर क्षेत्रातील जनतेच्या साम्राज्याविरोधी संघर्शाच्या परराष्ट्र धोरणांची तार्किक अभिव्यक्ती होती. नामिबियाला स्वातंत्र्य मिळणे बाकी होते, दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णियांना अन्यायाचे बळी व्हावे लागत होते. विकसनशील राष्ट्रावर आर्थिक, राजकीय दबाव टाकला जात होता. अंतर्गत प्रश्नात हस्तक्षेप केला जात होता. येणाऱ्या वर्षात नॅम चळवळ ही विकासाच्या आड येणाऱ्या अडथळ्यावर लक्ष केन्द्रीत करणार होती.[४]

**नॅमचे ७ वे संमेलन**

नॅमचे ०७ संमेलन ७–११ मार्च १९८३ या कालावधीत दिल्ली येथे आयोजित करण्यात आले. या संमेलनात ९६ देशांनी भाग घेतला, २६ देषांचा सहभाग अतिथी आणि निरीक्षक म्हणून राहिला.

०७ मार्च १९८३ च्या सकाळी इंदिरा गांधी यांची एकमताने मुख्य व्यक्ती म्हणून निवड झाली. फिडेल कॅस्ट्रो यांनी त्यांचे नाव सुचविले आणि इथियोपिया, मलेशिया, सायप्रस, अर्जेन्टिना यांच्या प्रतिनिधींनी अनुमोद्न दिले. पॅलेस्टाईन लिबरल ऑर्गनायझेषन (पी.एल.ओ) ने त्यांना पाठिंबा दिला. परिशदेमध्ये बहामा, बारबादोस आणि कोलंबिया हे नवीन सदस्य नॅम चळवळीमध्ये सामील झाले. ०७ व्या परिशदेमध्ये इंदिरा गांधी यांचे उद्घाटनपर भाशण झाले. भाषणात मुख्य भर निषस्त्रीकरण आणि अण्वस्त्र युद्धांचा मानवंशास्त्रासाठी धोका आणि नवी आर्थिक व्यवस्था हे होते. इराण– इराक संघर्षाला त्यांनी 'शोकांतिक युद्ध' म्हटले. त्याचबरोबर त्यांनी अफगाणिस्तानमधील परिस्थितीचा उल्लेख केला. नॅम चळवळीच्या प्रतिनिधींनी इशारा दिला कि जागतिक अर्थव्यवस्था कोसळण्याच्या परिस्थितीत होती आणि अण्वस्त्र युद्धाचा धोका अस्तित्वात होता. त्यांनी खेद व्यक्त केला जगाच्या विकासासाठी कोणतीही सुरक्षा राहिलेली नव्हती. आर्थिक परिस्थिती तुटलेली होती. नॅम चळवळ ही आंतरराष्ट्रीय आर्थीक संबधाच्या बांधणीसाठी उभी होती. त्यांची अशी इच्छा होती कि येणाऱ्या अक्टांड व इतर परिषदामध्ये कोणती नीती स्वीकारावी याची रूपरेषा तयार करावी.

इंदिरा गांधी म्हणाल्या कि मंदीमुळे जगातील उत्पादनामध्ये १.२ टक्क्यांनी १९८१ मध्ये घट झाली आणि विकसित देशामध्ये ३० दशलक्ष अधिक, १० टक्क्यापेक्षा बेरोजगारीचे प्रमाण वाढले, गरीब देशामध्ये बेरोजगारीची परिस्थिती सतत भेडसावत राहिली. तेल उत्पादक विकसनशील देशामध्ये मोठ्या प्रमाणात मानवी समस्येमध्ये वाढ झाली. १९७९ सालापासून विकसनशील देशांच्या निर्यात मुल्यातील

तूट १०० बिलियन डॉलर एवढी झाली होती. व आंतरराष्ट्रीय कर्जाचे ओझे ६०० बिलियन डॉलर एवढे झाले होते हि पूर्वीपेक्षा दुप्पट होते. विकसनशील देशांना मिळणाऱ्या मध्यम मुदतीच्या व दिर्घ मुदतीच्या कर्जात १० बिलियन डॉलर एवढी कपात झाली होती. सवलतीच्या दरात मिळणाऱ्या मदतीत झपाट्याने घट झाली होती. (आय.डी.ए.) ला देण्यात येणाऱ्या निधीत कपात झाल्यामुळे कमी उत्पन्न देशांना जागतिक बँकेतून मिळणाऱ्या मदतीवर मर्यादा आल्या होत्या. मागील दोन वर्षात निर्यातीतून मिळणारे विकसनशील देशांचे उत्पन्न ४० बिलियन डॉलर ने घटले होते. निर्यात केल्या जाणार्या वस्तूच्या किमतींनी मागच्या ५० वर्षाच्या निच्चांक गाठला होता. आंतरराष्ट्रीय कर्जावरील व्याजाचे दर कधी नव्हे एवढे वाढले होते. विकसनशील देशांना त्यांच्या उत्पादित वस्तूंना कमी भाव मिळत होता व आयात केलेल्या औद्योगीक वस्तूंना जास्त किमत द्यावी लागत होती. इंदिरा गांधी म्हणाल्या कि ओटावा परिषदेमधील कॅनकून आणि व्हसार्य परिषदेमध्ये विकसित आणि विकसनशील राष्ट्रांत कोणत्याही प्रकारचा संवाद झाला नव्हता. फक्त उत्तरेकडील काही राष्ट्रामध्ये सामाजिक, आर्थिक विकासासासंबधी त्यांच्या स्वतःच्या इच्छेनुसार संवाद झाला. अपुरे आणि असमान व कालबाह्य झालेल्या आर्थीक आणि आंतरराष्ट्रीय नानेनिधीतून सर्वसमावेशक सुधारणेचा प्रश्न अषा परिषदेमधुन सोडविला पाहिजे. गरिबी घालविण्यासाठी निदान महत्वाचे होते. विधान हे आपल्या मुल गरजा भागविणारे होते. परंतु ते काही समस्या निर्माण करण्याकडे जात होते. प्रत्येक देशाला विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा आधार होता, परंतु तंत्रज्ञान वापर हा आपल्या अनुभवातून झाला पाहिजे. नॅम चळवळीने या विषयाकडे लक्ष दिले होते मागील काही वर्षात कृशी क्षेत्रात, बांधकाम, बिजवाणाच्या संशोधनात, सार्वजनिक, आरोग्य, तंत्रज्ञान, प्रशिक्षण, आणि काही ओद्योगिक क्षेत्रात चांगले सहकार्य राहिले होते. इंदिरा गांधी म्हणाल्या कि अद्याप ही वेगेवेगळ्या प्रकारचा हस्तक्षेप उघड आणि छुप्या रीतीने आशियायी, आफ्रिका, लॅटीन अमेरिका या ठिकाणी होत होता. जागतिक सत्तांचे हस्तक्षेप आणि आक्रमण हे न्यायीपणावर आणि नैतिक नव्हते पॅलेस्टाईन लोकांना पाठिंबा देण्याबाबतीत नॅम चळवळ एकदिलाची होती. इस्त्राईल निर्लज्जपणे आक्रमण करत होता पण अशा प्रकारे पॅलेस्टाईन लोकांचे रास्त हक्क कायमचे अडवून ठेवणे हे शक्य होणार नव्हते. दक्षिण आफ्रिका सुद्धा बेकायदेशिररित्या वागत होती. प्रिटोरिया सरकारने वंशवादाला संस्थात्मक स्वरूप दिले होते. आपले स्वतःचे लोक, नामिबियाचे लोक आणि शेजाऱ्याविरुद्ध केलेली आक्रमणे अपमानास्पद होती. सैनिकीकरण आणि अण्वस्त्रीकरण हे दिएगो गार्सिया वर आधारित होते. युनोने जाहीर केल्याप्रमाणे किनारपट्टीलगतचे क्षेत्र आणि भारतीय भूप्रदेश शांतता क्षेत्रात यायला पाहिजे. इंदिरा गांधीनी आवाहन केले कि अंतर्गत संबधांतून आणि युनोच्या सहकार्याने ३८ व्या आमसभेत एक आठवडा किंवा १० दिवस सगळ्यांनी एकत्र येऊन महत्वाच्या समस्यांवर चर्चा केल्यास ते फायद्याचे ठरेल. १९८५ हे वर्ष युनोच्या सबलीकरणासाठी महत्वाचे ठरावे जगातील शांतता हि निशस्त्रीकरणावर विसंबून होती. अण्वस्त्रधारी नसलेले सर्व देश शांततेसाठी एकत्र आले पाहिजेत. इंदिरा गांधीनी नॅम चळवळीच्या प्रमुख म्हणून १२ मार्च १९८३ रोजी पहिली पत्रकार परिषद घेतली. त्या म्हणाल्या कि नॅम चळवळीचे निर्णय प्रत्येक प्रश्नाची गुणवत्ता पाहून घेतलेले होते. कोणाच्या मैत्रीचा किंवा शत्रुत्वाचा विचार केलेला नव्हता. नॅम चळवळ रुळावर आलेली होती. व तिने आपल्या जुन्याच तत्त्वाचा व विचारांचा पुनरुच्चार केला होता. चळवळ कोणाच्याही बाजूला झुकलेली नव्हती. अफगाणीनिस्थानच्या प्रश्नावर जी आरडाओरड केली जात होती. त्यामुळे समस्येचे समाधान शोधण्यास मदत होणार नव्हती. अफगाणिस्तानमधील हस्तक्षेपाविषयी जे लोक आता बोलत होते. ते व्हियतनाममधील आक्रमणा विशयी कधी बोलले नव्हते. आपणास धोका आहे असे एखाद्या लहान देशाला वाटले असेल व त्याने परकीय सैनिकांना बोलावले असेल तर तो त्या देशाचा प्रश्न होता. इंदिरा गांधीना परकीय सैनिकांना बोलविणे किंवा परकीय हस्तक्षेप पसंत नव्हता. त्यांच्याबरोबर जगाच्या इतर भागातसुद्धा हस्तक्षेप होत होता व आशीयीकरण होत होते व निर्वाचित लोकांच्या जागी कळसूत्री सरकारे स्थापन केली जात होती याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. इंदिरा गांधीनी ३० महिने जुन्या इराण इराक संघर्षावर खेद व्यक्त केला इराण आणि इराक यांनी शांततापूर्ण साह्चार्याने प्रश्न निभवायला हवेत असे त्या म्हणाल्या. नॅम चळवळीच्या ७ व्या परिषदेत बाह्यनिरिक्षक रिचर्ड एल.जॅक्सन हे होते. ते परराष्ट्र सेवेत अधिकारी होते. ते नॅम चळवळीच्या अभ्यासाचे निरीक्षक म्हणून राहिलेले होते. सोमालियात अमेरिकेचे राजदूत म्हणून आणि नंतर युनोच्या यु.एस.मिशन चे ते राजकीय सल्लागार म्हणून राहिलेले होते. त्यांनी निष्चयपूर्वक सांगितले कि १९८३ च्या नॅम प्रस्तावामध्ये संधिग्ता होती.

इंदिरा गांधी यांनी युरोपियन राष्ट्रांना नॅमची तत्वे व वंशवाद विरोध या मुद्द्यांची नेहमी जाणीव करून दिली. आय.डी.ए. बाबतीत इंदिरा गांधीनी स्पष्ट केले की, निधी भारत स्वतसाठी मागत नव्हता. विकसनशील राष्ट्रासाठी मागत होता. औद्योगिक मंदीने प्रगत राष्ट्रे सुद्धा त्रस्त होती. यासाठी इंदिरा गांधीनी जागतिक नाणेनिधी, उद्योगधंद्यातील स्थिरता यावर भर दिला. कडून विकासात्मक नवीन धोरणाची अपेक्षा केली. फ्रान्सच्या भेटीत त्यांनी नाणे व्यवस्थेतील सुधारणावर भर दिला. अध्यक्ष मितराँ आर्थिक संबधातील सहकार्याबाबत अनुकुल होते.

### साधन सूची


१) *रिलेव्हन्स ऑफ नॉन आलाइनड मुव्हेंट, १९ जानेवारी १९८१, सिलेक्टेड स्पीचेस ॲंड राइटींग्ट ऑफ इंदिरा गांधी, पब्लीकेशन, डिव्हिजन भारत सरकार, नवी दिल्ली,१९८५ खंड ४, पृ ५०३.*

२) *उपरोक्त पृ५०४.*

३) *नॉन अलाइनमेंट ॲंड फ्रीडम, ०९ फेब्रुवारी १९८१, सिलेक्टेड स्पीचेस ॲंड राइटींग्ट ऑफ इंदिरा गांधी, नवी दिल्ली,१९८५ खंड ४, पृ ५०५.*

४) *उपरोक्त.*

५) *उपरोक्त पृ*